(५०)

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.


:: प्रधान कार्यालय ::

" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट , मुंबई ४०० ००१,    दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९


# वैयक्तिक अर्जदारांसाठी बिलडिस्काऊंटींग कर्ज सुविधेचे धोरण

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण

## वैयक्तिक अर्जदारांसाठी बिल डिस्काऊंटिंग कर्ज सुविधेचे धोरण

**प्रास्ताविक :**

बँकेच्या कार्यक्षेत्रातील / बृहन्मुंबईतील बँकेच्या वैयक्तिक खातेदार यांना खेळत्या भांडवलासाठी कर्ज पुरवठा करीत असून. तसेच खातेदार यांना मालाचे उत्पादन वाढविण्याकरीता नियंत्रित अनियंत्रित मालाची खरेदी करण्याकरिता, मागणी प्रस्तावित करणा-या कंपन्यांना मालपुरवठा नियंत्रित व वेळेत करता यावा यासाठी व अपू-या खेळत्या भांडवलाचा प्रश्न / समस्या सोडविण्याकरिता बिल डिस्काऊटींग सुविधा दिली जाणार आहे.

**कर्ज सुविधेचे निकष :**

१) वैयक्तिक अर्जदार यांनी उत्पादीत केलेला माल बृहन्मुंबईतील सरकारी कार्यालय नामांकित कंपन्या/ आस्थापनेला / हॉटेल्सना पुरवठा करीत असेल तर त्यांचेकडून प्राप्त होणाऱ्या ९० दिवसांच्या बिलांच्या तारणांवर ८०% पर्यंत व कमाल रु.४०.०० लाख ९० दिवसाच्या मुदतीने मंजूर करण्यात येईल. **(दि.०४/०६/२०२४ रोजीच्या कर्ज विभागातील कार्यालयीन सुचनेनुसार)**

संचालक मंडळ सभा दि.३१/१०/२०१४ ठराव क्र.७ नुसार

२) नामांकित कंपनीमध्ये (उदा. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, एल ॲण्ड टी. रिलायन्स इंडस्ट्रीज, रिलायन्स एजन्सी, ताज हॉटेल, ऑबेरॉय हॉटेल, पंचतारिक हॉटेल, महानगरपालिका, इत्यादी चा समावेश राहील. तसेच पब्लिक लिमिटेड कंपन्या, रेल्वे, सेंट्रल स्टेट केंद्र सरकार, राज्य सरकार, शासकीय महामंडळे, विमा कंपन्या, शासन मान्यता शैक्षणिक संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती, महानगर पालिका, एअर पोर्ट ॲथॉरिटी, सिडको, माफको, म्हाडा, MMRDA.)

३) बिल डिस्काऊंटिंग कर्ज सुविधा देताना बिलांचा वसूल पात्र कालावधी विचारात घेतला जाईल. बिलांचा वसूल पात्र कालावधी ९० दिवसांचा असला पाहिजे. (जूनी बिले ग्राहय धरता येणार नाहीत.) बिलाची रक्कम तीन महिन्यामध्ये वसूल होणारी असली पाहिजे.

४) अर्जदार यांना प्राप्त होणा-या बिलांच्या रक्कमेच्या तारणावर ८०% रक्कमेची उचल देण्यात येईल.

५) ज्या अर्जदारांना बिल डिस्काउटिंग सुविधा दिली जाणार आहे. त्यांना धनादेश देणा-या कंपनी/ आस्थापनेने "बँक व अर्जदार" यांचे संयुक्त नावाने धनादेश देणेबाबत संमती दर्शक पत्र सादर करावे लागेल.

६) बिल डिस्काऊटिंग सुविधा ९० दिवसाकरिता दिली जाईल. मात्र नजिकच्या तीन महिन्याच्या कालावधीत वसूल होणा-या रकमाची बिले विचारात घेतली जातील. तीन महिन्याच्या कालावधीतील बिलांची रक्कम विहित मुदतीत वसूल न झाल्यास अर्जदार / कर्जदार यांना व्याजासहीत परतफेड करावी लागणार आहे. मागील बिलांच्या वसूलीसाठी नविन बिले विचारात घेतली जाणार नाहीत.

**पात्रता :**

अ) बँकेच्या कार्यक्षेत्रातील / बृहन्मुंबईतील कंपन्या / एजन्सी किंवा प्रोप्रायटर्स/भागीदार यांना सदर कर्ज सुविधेस पात्र राहातील.

ब) सदर कर्ज सुविधा ही बँकेच्या शाखेतील अर्जदाराचे चालू खाते उघडून एक वर्षे झाले आहे व त्यांची उलाढाल / व्यवहार चांगले आहेत ते या सुविधेस पात्र राहातील.

क) कंपनी / फर्म स्थापन होऊन तीन वर्षे झालेली असली पाहीजे किमान दोन वर्षाची आर्थिक उलाढाल/ व्यवहाराची चार्टड अकौंटेटने आर्थिक पत्रके प्रमाणित केलेली असतील असे अर्जदार कर्जास पात्र राहातील.

ड) बिल डिस्काउटिंग सुविधा वसुलपात्र बिलांच्या तारणावर दिली जाणार असल्याने माल पुरवठ्यापोटी/ बिलापोटी धनादेश काढणारी संस्थाही मुंबै बँकेच्या कार्यक्षेत्रातील / बृहन्मुंबईतील असावी.

इ) रु.१.०० लाखावरील कर्जाकरिता कोलॅटरल सिक्युरिटी म्हणून प्रोप्रायटर्स/ पार्टनरशिप फर्म/कंपनीच्या नावे असलेला फ्लॅट/ दुकान/ गाळा (केंद्रकार्यालयाचे परिपत्रक क्र.जा.क्र. मुंबै बँक/ कर्ज विभाग/फा– कार्यालयीन सुचना /२०१३–२०१४/२०७५५ दि.१०/१०/२०१३ नुसार कार्यवाही करावी) तसेच नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट/ किसान विकास पत्र / सोने /जीवन विमा पॉलिसी (सरेंडर व्हॅल्यूनुसार) / मुदत ठेव पावत्या सादर करावी लागेल.

रु.१.०० लाखापर्यतच्या कर्जास दोन जामिनदार आवश्यक व रु.१.०० लाखावरील कर्जास अतिरिक्त तारण घेत असल्याने जामिनदार आवश्यक नाही.

**संचालक मंडळ सभा ४२/३ री दि.०४/०६/२०१६ ठराव क्र.५ नुसार**

**कर्ज मागणी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :– (के.वाय.सी. पूर्ततेसह)**

१. अर्जदाराचे पॅनकार्ड, रेशनकार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हग लायसन्स, निवडणूक कार्ड, लाईट बील.

२. फर्मची/कंपनीची/व्यवसायाची मागील तीन वर्षाची आर्थिकस्थिती दर्शक पत्रके CA कडून प्रमाणित केलेली व मागील तीन वर्षाचे आयटी रिर्टन सादर करावे लागेल.

३. गुमास्ता लायसन्स

४. जामिनदाराबाबत पॅनकार्ड, रेशनकार्ड, लाईट बील, मागील तीन महिन्याची पगारस्लीप किंवा व्यवसायाची मागील तीन वर्षाची आयटी रिर्टन

५. अद्यावत कंपनीकडून येणे असलेल्या बीलांची यादी व त्याबरोबर कंपनीचे कन्फरमेशन लेटर सोबत जोडावे लागेल.

६. व्यवसायाची जागा भाड्याने असल्यास त्याचे नोंदणीकृत (Registered) लिव्ह लायसन्स ॲग्रीमेंट.

७. अद्यावत संड्री क्रेडिटर्स यादी.

८. रु.१.००/– लाखावरील कर्जासाठी कोलॅटरल सेक्यूरिटी म्हणून देत असलेल्या मालमत्तेचे दस्तऐवज (झेराक्स)

   a. सेल डिड ॲग्रीमेंट
   b. सोसायटी मेंटेनन्स स्लीप
   c. सोसायटी N O C ( बँक नमून्यांत )
   d. टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट
   e. व्हॅल्यूएशन रिपोर्ट
   f. शेअर सर्टिफिकेट

**कागदपत्रे :** ( कर्ज उचलीबाबतचे दस्तऐवज )

अर्जदारास बिल डिस्काऊटींग कर्ज सुविधा मंजूर झाल्यानंतर खालील कागदपत्रे सादर केल्यानंतर उचल देण्यात येईल.

१) वचन चिठ्ठी
२) लेटर ऑफ लीन ॲण्ड सेट ऑफ
३) लेटर ऑफ कंन्टीन्यूटी सिक्युरिटी.
४) लेटर ऑफ अंडरटेकिंग फॉर बिल डिस्काऊटींग फॅसिलीटी.
५) ॲग्रीमेंट फॉर कलेक्शन डिस्काऊटींग बील्स.
६) नाममात्र सभासद अर्ज.
७) मॉर्गेज डीड (रु.१,००,०००/- वरील कर्जास ) (कोलॅटरल सेक्यूरिटी )
८) ॲथोरिटी डेबिट अकाऊंट
९) डिक्लरेशन ऑफ शुअरीटी.

**वैयक्तिक बीलडिस्काऊंटींग अटी व शर्ती:**

१) अर्जदारास कर्ज प्रस्ताव हाताळणी सेवा शुल्क कर्ज रक्कमेच्या १/२ % राहील.
२) अर्जदार व जामिनदार यांना बँकचे नाममात्र सभासद व्हावे लागेल.
३) अर्जदारांची बचत व व्यवसायाचे चालूखाते बँकेच्या शाखेत उघडून त्यामार्फत व्यवहार करावा लागेल.
४) अर्जदार बँकेच्या कार्यक्षेत्रातील असल्याचा पुरावा सादर करावा लागेल व त्यांना सदर सुविधा घेता येईल.
५) ९० दिवसाच्या आतील बिलाच्या ८०% प्रमाणे कमाल रु.४०.००लाखाची उचल दिली जाईल. सदर कर्जाची मुदत ९० दिवसाची राहील व्याजदर -- असून कर्जावरील व्याजदरामध्ये वेळोवेळी होणारे बदल कर्जदारावर बंधनकारक राहतील. **(दि.०४/०६/२०२४ रोजीच्या कर्ज विभागातील कार्यालयीन सूचनेनुसार)** (सं.मं.सभा दि.०४/०२/२०२२ ठराव क्र.७ नुसार)
६) कर्जावरील व्याज दरमहीन्यास कर्जदारास भरावे लागेल मुदतीअंती कर्जाची परतफेड न केल्यास १५.५०%अधिक २%दंडव्याज व दरमहा लेट फी म्हणून रु.५००/-आकारणी इत्यादी करण्यात येईल.
७) रु.१.००लाखावरील कर्जाकरिता कोलॅटरल सिक्युरिटी म्हणून प्रोप्रायटर्स/पार्टनरशिप फर्म/ कंपनीच्या नावे असलेला फ्लॅट/ दुकान/ गाळा (केंद्रकार्यालयाचे परिपत्रक क्र.जा.क्र. मुंबै बँक/ कर्ज विभाग/फा- कार्यालयीन सुचना /२०१३-२०१४/२०७५५ दि.१०/१०/२०१३ नुसार कार्यवाही करावी) तसेच नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट/ किसान विकास पत्र / सोने /जीवन विमा पॉलिसी (सरेंडर व्हॅल्यूनुसार) / मुदत ठेव पावत्या सादर करावी लागेल.
८) अर्जदार बँकेस तारण देत असलेल्या जागेबाबत वकीलाचे टायटल रिपोर्ट व मुल्यांकनाचा वास्तु विशारदाचा दाखला तर सोने तारणाबाबत मुल्यांकनकाराचा दाखला सादर करावा लागेल. व सदर खर्च कर्जदाराने करावयाचा आहे.
९) अर्जदारास येणे असलेल्या बिलांपोटी मिळणारा धनादेश कर्जदाराच्या व बँकेच्या संयुक्त नावे काढण्याबाबत समोरील कंपनी / फर्म यांचे हमीपत्र सादर करावे लागेल.
१०) अर्जदार जर कर्जदार कंपनी असेल तर कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, संचालक मंडळ नांवे, राहण्याचे पत्ते व व्यवसायाचे पत्ते व कर्ज घेणे करिता बोर्डाचा ठराव सादर करावा लागेल.
११) अर्जदार पार्टनरशिप फर्म असेल तर पार्टनर्सचे नाव, घरचे पत्ते, रजिस्टर पार्टनरशिपडीड सादर करावे लागेल. अन्यथा प्रोप्रायटरशिप फर्म बाबत प्रोप्रायटरचा घरचा पत्ता सादर करावा लागेल.